# उपसंहार

वा. ल. कुलकर्णी यांच्या साहित्य समीक्षेचे विशेष या प्रबोधिकेमध्ये एकूण सहा प्रकरणांचा सामावेश आहे. प्रबंधिकेची सुरुवात प्रास्ताविक व पूर्वाभ्यासाने केलेली आहे. नंतर मनोगत व्यक्त करुन प्रकरणांना सुरुवात केलेली आहे.

प्रकरण पहिले 'मराठी समीक्षेची पूर्वपीठिका'. या प्रकरणांमध्ये मराठी समीक्षेचे प्राचीन काळापासून ते अर्वाचीन काळापर्यंत स्वरुप कस कसे होते. समीक्षेचा प्रवाह हा कसा वाहत आला. कोणकोणती वळणे घेतली. या सर्वांचा आढावा या प्रकरणांमध्ये घेतलेला आहे.

'समीक्षेची पूर्वपीठिका' या प्रकरणांमधून समीक्षकांचा क्रम दिलेला आहे. समीक्षकांचे गुणविशेष, त्यांच्या टीकाग्रंथाची नावे. एक समीक्षक म्हणून असणाऱ्या त्यांच्या स्थानाची ओळख करुन दिलेली आहे. समीक्षकांची समीक्षेविषयीची कामगिरी. समीक्षकांचे आपआपसांत असणारे मतभेद एकमेकांच्या समीक्षेवर केलेली प्रतिक्रिया या प्रकरणांमध्ये मांडलेली आहे. त्याचबरोबर कालखंडाचा उल्लेखही केलेला आहे. या प्रकरणांची मांडणी अतिशय शिस्तबद्धपणे व सुलभ पद्धतीने मांडणीकरण्याचा प्रयत्न केलेला आहे.

दुसऱ्यांच्या दोषांवर बोट ठेवणे ही मानवी प्रवृत्तीच आहे. या मानवी प्रवृत्तीला अनुसरुन प्राचीन काळातही समीक्षा लेखन केले जाऊ लागले.

प्राचीन काळातील समीक्षेचे स्वरुप मांडत असताना समीक्षेला सुरुवात ही केव्हापासून झाली. तर मानवी इतिहासात काव्यकला सुरू झाली. तेव्हापासून काव्याच्या गुणांसंबंधी उद्गार काढण्याची प्रवृत्ती कोणत्या ना कोणत्या स्वरुपामध्ये असलीच पाहिजे काय. बरे काय वाईट याची चर्चा पूर्वीपासूनच केली जाते. तशीच वाङ;मयासंबंधीही केली जात असली पाहिजे. कविची ही स्वाभाविक प्रवृत्ती आहे या प्रवृत्तीतूनच समीक्षेला सुरुवात झाली. प्राचीन साहित्याच्या समीक्षेला इथूनच सुरुवात झाली.

प्राचीन कालखंडातील समीक्षेचे चार कालखंड पाडलेले आहेत. आणि त्या कालखंडाची सविस्तर माहिती या प्रकरणांमध्ये मांडलेली आहे.

१) प्राचीन मराठीतील साहित्य शास्त्रीय विचार प्रारंभ ते १८००

२) इंग्रजी प्रभावाचा काळ इ. स. १८०० ते १८७४.

३) विष्णूशास्त्रीचा काळ इ. स. १८७४ ते १९२०.

४) अर्वाचीन काळ इ. स. १९२० ते १९६०.

प्राचीन मराठीतील साहित्य शास्त्रीय विचारात दोन टप्पे पडतात.

अ) संत कवींचा साहित्यशास्त्रीय विचार.

ब) पंडितकवींचा साहित्यशास्त्रीय विचार.

हे संत व पंडितांचे साहित्यशास्त्रीय विचार सविस्तरपूर्वक मांडलेले आहेत.

प्राचीन काळातील एकनाथ, रामदास, ज्ञानेश्वर, पंडित कवि यांसारख्या संत पंडितांनी काव्याचे गुणदोष विवेचन केलेले आहे. या संताच्या समीक्षेच्या भाषेचे स्वरुप, विषयाची मांडणी केली आहे. एकमेकांचे आदर्श घेत व परंपरा जपत हे संत पुढे आले. प्राचीन काळातील संताच्या समीक्षेचे गुणविशेष

सांगितले. ज्ञानेश्वरांनी स्वत:कडे केवढी विनम्र भूमिका घेतली. एकनाथ हे तर टीकाकारांचे टीकाकार वाटतात. पंडित कवींचा साहित्यशास्त्राकडे पाहण्याचा दृष्टीकोण ह्या प्रकरणांमध्ये विशद केलेला आहे. प्राचीन काळातील एकूण सर्व समीक्षकांचा व समीक्षेतील बदल, दृष्टीकोण, विचारांची मांडणी केलेली आहे. आणि सर्व संत समीक्षकांचा आढावा कालखंडाच्या उल्लेखासहित सविस्तर केलेला आहे. प्राचीन कालखंडानंतर अर्वाचीन कालखंडाला सुरुवात झाली. समीक्षक नवनविन उदयाला आले. साहित्यात बदल झाल्यानंतर समीक्षकांच्या समीक्षेमध्येही बदल झाले.

अर्वाचीन काळातील समीक्षक म्हणजे कृष्णशास्त्री चिपळूणकर, रा. भि. गुंजीकर, लोकहितवादी, कुंटे, दादोबा पांडुरंग, रानडे यांची भर पडली. त्यांनी अभिप्राय वजा समीक्षा केली. यासर्व समीक्षकांची मांडणी क्रमानुसार मांडण्यात आली. आणि समीक्षेचे स्वरुप मांडून वैशिष्ट्ये नमूद करण्यात आलेली आहेत. अर्वाचीन काळांमध्ये समीक्षेला सुरुवात ही विविधज्ञान विस्तारातून झाली. विविधज्ञान विस्तारातील समीक्षेचे स्वरुप, विशद करण्यात आले. गुंजीकरांची समीक्षा विस्तारपूर्वक मांडल्यानंतर भिडे, वि. मो. महाजनी यांनी विविधज्ञान विस्तारातून समीक्षा केली.

पाश्चात्य टीकापद्धतीचा परिणाम कस कसा झाला त्याचे ही वर्णन करण्यात आलेले आहे. चिपळूणकरांपासून स्फूर्ती घेऊन पुढील समीक्षक आले ते म्हणजे आगरकर, शि. म. परांजपे, १८०० ते १८७४ हा आणि १८८२ ते १८९० हा टीकालेखनाचा दुसरा कालखंड गो. ग. आगरकर, बा. गं. टिळक, शिवराम महादेव परांजपे, श्री. कृ. कोल्हटकर, चितांमणराव वैद्य, यांच्या टीकालेखनाचा सविस्तर आढावा घेतलेला आहे. अर्वाचीन टीकाशास्त्राला व तिच्या प्रगतीला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचाही विचार करण्यात आला. आणि त्यांचा ही उल्लेख सविस्तर मांडलेला आहे. समीक्षेची एकमेकांबरोबर केलेली तुलना स्पष्ट केलेली आहे.

समीक्षकांनी इतर समीक्षकांवर टीका केली. त्याचबरोबर वाड;मयावरही समीक्षा केली. समीक्षकांनी इतर समीक्षकांवर मांडलेल्या मतांचा आढावा या पूर्वपीठिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर समीक्षेला 'उपमा' देऊन समीक्षेची भाषा चमकदार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. उदा.- वा. मा. पाठक चाफेकरांच्या समीक्षेबद्दल म्हणतात. चाफेकरांची समीक्षा म्हणजे फणसाच्या सुरस गऱ्यांचाच लाभ देतात. कोल्हटकरांनी समीक्षेबद्दल केळकरांच्या असे म्हटलेले आहे की, हा शिकारी माणूस आहे. कोल्हटकरांच्या समीक्षेनंतरचे समीक्षक 'नरसिंह चिंतामण केळकर'. यांची व्याख्या, यांचा उल्लेख केलेला आहे. केळकरानंतरचे समीक्षक म्हणजे 'वामन मल्हार जोशी' वासुदेव बळवंत फडके यांच्या टीकाग्रंथाचा उल्लेख केलेला आहे. नंतरचे समीक्षक आहेत वामन मल्हार जोशी, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर या सर्व समीक्षकांचे समीक्षेबद्दलचे कार्य व योगदान दिलेले आहे. त्याच बरोबर समीक्षेची वैशिष्ट्ये नमूद केलेली आहेत. पुढील समीक्षक 'नारायण सीताराम फडके' यांच्या नंतरचे समीक्षक वि. स. खांडेकर यांच्या समीक्षेबद्दलच्या लेखनाचा उल्लेख केलेला आहे. पुढील समीक्षक गजानन त्र्यंबक माडखोलकर व नंतरचे टीकाकार बा. ना. देशपांडे पुढील समीक्षक श्री. के. क्षीरसागर, वाळिंबे. समीक्षक पु. शि. रेगे. नंतरचे समीक्षक बा. सी. मर्ढेकर म्हणून ओळखले जातात.

हे सर्व मराठी समीक्षक आहेत. वाड;मय क्षेत्रामध्ये समीक्षकांनी आपली भूमिका समीक्षक म्हणूनच

निभावली नाही तर ते एक लेखक, कवि, कादंबरीकार, कथाकार म्हणूनही आपले वाड;मयक्षेत्रात निर्माण केले.

मराठी समीक्षेची पूर्वपिठिका या प्रकरणांमध्ये समीक्षकांच्या कालखंडानुसार क्रम विशद केलेला आहे. आणि त्या त्या समीक्षकांच्या टीकाग्रंथाचा, समीक्षेच्या वैशिष्ट्यांचा, कालखंडाचा समीक्षणात्मक गुण-दोषांबद्दल, वाड;मयीन कार्य, समीक्षेकडे पाहण्याचा दृष्टिकोन, जन्म, विचारसरणी, आवड, निवड या सर्व गोष्टींचा समावेश करुन क्रमानुसार मांडणी करुन मराठी समीक्षेच्या पूर्वपीठिकेचा आढावा वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेचे विशेष या प्रबंधिकेतील प्रकरण पहिले 'मराठी समीक्षेची पूर्वपीठिका' यांमध्ये केलेला आहे.

वाड;मयक्षेत्रामध्ये ज्याप्रमाणे लेखकांनी समीक्षा केली. त्याचप्रमाणे स्त्री समीक्षकांचाही समावेश आहे. उदा.- कुसुमावती देशपांडे, १९५० ते १९७३ हा त्यांचा कालखंड आहे. त्यांच्या नंतरचे समीक्षक दि. के. बेडेकर पुढील समीक्षक म्हणजे गंगाधर गाडगीळ. गाडगीळानंतरचे टीकाकार म्हणजे वा. ल. कुलकर्णी. अर्वाचीन काळातील सर्वात शेवटचे समीक्षक म्हणजे नरहर कुरुंदकर पुढील समीक्षक म्हणजे शरचंद्र मुक्तीबोध.

मराठी समीक्षेची पूर्वपीठिका या प्रकरणांमध्ये प्राचीन समीक्षा आणि अर्वाचीन समीक्षेचा यांचाही उल्लेख केलेला आहे. समीक्षेच्या प्रवाहाने कोण कसकशी वळणे घेतली याची जाणीव होते.

मराठी वाड;मयक्षेत्रातील समीक्षक आणि त्यांच्या कार्याचा आढावा क्रमवार या प्रकरणांमध्ये घेतलेला आहे. समीक्षेच्या खोलीचे व व्यापकतेचे दर्शन होते.

प्रबंधिकेतील २ रे प्रकरण म्हणजे वा. ल. कुलकर्णी यांचे 'समीक्षा लेखन' या प्रकरणामध्ये वा. ल. चे संपूर्ण समीक्षा लेखन मांडलेले आहे. वा. लं. नी कथा, कादंबरी, कविता, चरित्र, आत्मचरित्र, लघुकथा, नाटक, एकांकिका, विख्यात लेखकाची लेखनशैली या सर्व वाड;मय प्रकारांची वा. ल. नी समीक्षा केली. आणि या सर्वांचा उल्लेख त्यांच्या प्रकरण २ रे वा. ल. चे समीक्षा लेखन यांमध्ये सविस्तरपूर्वक मांडलेले आहे.

वा. ल. कुलकर्णी यांचे समीक्षा लेखनाचा अभ्यास करता करता त्यांच्या व्यक्तिमत्वाची ओळख होते. त्यांच्या अभ्यासाची व्याप्ती लक्षात येते. समीक्षा करताना त्यांनी कोणकोणत्या गोष्टींचा आधार घेतला. त्या गोष्टी लक्षात येतात. वा. ल. ना समीक्षा लेखन करताना येणारे अनुभव उदाहरणे यांची मांडणी समीक्षा लेखन करताना केलेली आहे. या सर्व गोष्टींचा उल्लेख सविस्तर त्यांच्या प्रकरणामध्ये केलेला आहे. वा. लं. च्या समीक्षा लेखनाचा शोध घेण्यासाठी त्यांची अनेक पुस्तके हाताळावी लागली. 'साहित्य आणि समीक्षा' हरिभाऊंची सामाजिक कादंबरी, वाड;मयीन वादस्थळे, वाड;मयातील दुर्बोधता, वाड;मयीन टिपा आणि टिप्पणी, वाड;मयीन मते आणि मतभेद, समीक्षा लेखन करताना वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षा लेखनाचे विशेष ही जाणवले. ते विशेष ही या प्रकरणात नमूद केलेले आहेत. केवळ पुस्तकातूनच त्यांनी समीक्षा लेखन केले नाही तर भाषणातून ही समीक्षेविषयीची विचार मांडले. आत्म प्रत्ययाला जागे ठेवून वा. ल. नी समीक्षा लेखन केले आहे.

समीक्षा लेखन करताना अनेक समीक्षकांची लेखकांची मते ही मांडलेली आहेत. उदा:- प्रो. फडके

म्हणतात, काव्याची भाषा ही दिसते साधी पण असते साधलेली.

वाड;मयीन मते आणि मतभेद या पुस्तकातून अनेक वाड;मयीन प्रश्नांविषयी, समस्याविषयी विचार मांडलेले आहेत. ते विचार ही या प्रकरणांत सविस्तरपूर्वक मांडलेले आहेत. मराठी लघुनिबंध म्हणजे 'गोड कुजबूज'. काणेकरांच्या लघुनिबंधाला 'तुटलेले तारे' अशा अधूनमधून उपमा देऊन समीक्षेमध्ये चमक आणली आहे.

वाड;मयाची वैशिष्ट्ये ही मांडलेली आहेत. समीक्षा लेखनामागे वाड;मय विकासाची तीव्र इच्छा जाणवते. समीक्षा लेखन करता करता भूमिका ही मांडलेली आहे. प्रकृती, प्रयोजन व भाषा याविषयी भूमिका मांडलेली आहे.

समीक्षा लेखन करताना अनेक उद्देश वाड;मयासंबंधीचे स्पष्ट केलेले आहेत. अनेक उद्देशांची पूर्णता करीत करीत वा. लं. नी समीक्षा लेखन केलेले आहे. ' मराठी रंगभूमी व नाटक' याविषयी ही वा. लं. नी समीक्षा सविस्तर मांडलेली आहे. वा. लं. ची समीक्षेची भाषा ही अतिशय साधी व समजायला सोपी वाटते. कालखंडाचा समीक्षेवर परिणाम होतो हे ही दाखवून दिलेले आहे. व्यक्तीचित्रणांविषयी समीक्षा ही केलेली आहे. समीक्षकांना समीक्षेबद्दल असणाऱ्या धोक्याच्या सूचना देतात. सर्व समीक्षेचे सूक्ष्मपणे वाचन केल्यानंतर वा. ल. म्हणतात, 'समीक्षा म्हणजे कधी ही न संपणारा शोध आहे'. चैतन्याचा शोध घेणे हे समीक्षेचे कार्य आहे असे सांगतात.

वा. ल. च्या समीक्षा लेखनातून वाचकांना वाड;मयाविषयी आवड निर्माण करून देण्याचे काम वा. ल. करतात. प्राचीन व अर्वाचीन गीत प्रकारांवर समीक्षा केलेली आहे.

वा. ल. च्या समीक्षा लेखनाचा अभ्यास करताना त्यांचे समीक्षा लेखन वाचताना समीक्षा लेखनाबरोबर विविध गुणांचे दर्शन होते. आणि हे गुण या प्रकरणांमध्ये मांडण्यात आलेले आहे.

वा. लं. नी आपल्या समीक्षा लेखनातून वाड;मयाची सेवा अतिशय जिव्हाळ्याने व आस्थेने केलेली दिसून येते.

अशा प्रकारे वा. ल. कुलकर्णी यांचे समीक्षा लेखन या प्रकरणांमध्ये वा. लं. नी कोणकोणत्या वाड;मयप्रकारांवर समीक्षा लेखन केले. त्यांची समीक्षा लेखनाची पध्दत, समीक्षा लेखनाविषयीची भूमिका, गुण-विशेष, समीक्षकांबद्दल मांडलेली मते, वाड;मयीन समस्या, शंका, टीकाकारांविषयी मांडलेली मते या सर्वांचा समावेश वा. ल. कुलकर्णी याच्या समीक्षा लेखनात मांडलेला असून जेव्हा वा. ल. कुलकर्णी समीक्षा करता करता स्वत:च्या अनुभवाद्वारे लेखन केले. निरनिराळी उदाहरणे देऊन आपल्या समीक्षेला प्रबळ केले. समीक्षा करता करता समीक्षेचे समर्थन ही केलेले आहे. उदाहरणांची व अनुभवाची मांडणी ही त्यांच्या समीक्षा लेखनात केलेली आहे. आणि अशा प्रकारे वा. ल. कुलकर्णी यांचे समीक्षा लेखन हे प्रकरण २ रे याचे स्वरुप याप्रमाणे स्पष्ट केले आहे. समीक्षा लेखनातून साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन लक्षात येतो.

प्रबंधिकेतील ३ रे प्रकरण आहे. वा. ल. कुलकर्णी यांची वाड;मयाची प्रकृती, वाड;मयाचे प्रयोजन आणि वाड;मयाची भाषा याविषयी भूमिका या प्रकरणांमधून वा. ल. कुलकर्णी यांनी वाड;मयाच्या प्रकृतीविषयी आपली भूमिका मांडलेली आहे. वाड;मयाची प्रकृती म्हणजे काय तिचे स्वरुप स्पष्ट करून आपल्या मनात

हा विचार वाड;मयाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनातून जन्माला आलेला आहे असे त्यांना वाटते. प्रकृतीची भूमिका स्पष्ट करताना 'प्रकृती' चे स्वरुप उलगडून दाखविताना वैशिष्ट्ये स्पष्ट करण्वासाठी अनेक उदाहरणांच्या साहय्याने प्रकृतीविषयी भूमिका स्पष्ट केलेली आहे. वाड;मयाची प्रकृती तयार होण्याची प्रक्रिया दाखवून दिलेली आहे. बालकविच्या फुलराणीचे उदाहरण दिलेले आहे त्यानंतर बीजगणिताचे उदाहरण दिलेले आहे आणि फरक स्पष्ट करून दिलेला आहेत. फुलराणीची प्रकृती आणि गणिताची प्रकृती यातील फरक अतिशय उत्तमपणे त्यांनी स्पष्ट करून दाखविलेला आहे.

भूगोलाचे पुस्तक आणि शेक्सपिअरची कादंबरी या वाड;मयाच्या प्रकृतीत फरक दाखवून व्यक्तीमत्वाचा ठसा (लेखकाच्या) भूगोलाच्या पुस्तकातून दिसत नाही. शेक्सपिअरच्या लेखन कृतीतून दिसतो. अतिशय सुंदर विधाने वा. ल. नी आपली भूमिका मांडताना वापरलेली आहेत. उदा:- फुलराणी म्हणजे कल्पना शक्तीच्या सहाय्याने व्यक्तीमनाने साधलेली एका अलौकिक सृष्टीची निर्मिती ही या लेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरते. प्रकृती विषयी भूमिका मांडताना प्रकृतिची वैशिष्ट्ये नमुद केलेली आहेत. अनेकत्वातून एकत्व प्रकट करणे ही ललितकृतीची प्रकृती आहे.

गणिताची सिद्धांताची सुसंघटना व ललितकृतीतील सुसंघटना यातील फरक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. वाड;मयाच्या प्रकृतीविषयी निर्माण होणाऱ्या अनेक समस्या मांडलेल्या आहेत. अशा प्रकारे वा. ल. कुलकर्णी यांनी आपली प्रकृतीविषयीची आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे.

वा. ल. कुलकर्णी यांनी वाड;मयाचे प्रयोजन या विषयीही आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. वाड;मयाच्या प्रकृतीवर वाड;मयाचे प्रयोजन अवलंबून असते. ललित लेखक लेखन करतो ते का ? व कशासाठी व रसिक वाचक ते का वाचतो कशासाठी ? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी वा. ल. प्रयत्न करतात. वाड;मयकृतीच्या स्वरुपानुसार प्रयोजनात बदल होतो. प्रयोजन ठामपणे व निश्चित मांडता येत नाहीत. वाचक व लेखक हे आपल्या अंदाजाप्रमाणे प्रयोजन लादतात. आणि प्रयोजन चुकीचे लादण्याचीही गरज असते. लेखकांच्या ललित कृतीकडे पाहण्याच्या दृष्टीकोनानुसार प्रयोजन हे बदलत असते. आपली प्रयोजनविषयी भूमिका स्पष्ट करण्यासाठी वा. ल. नी चित्रकलेचे प्रदर्शन व फुटपट्टीचे उदाहरण दिले. आपली भूमिका स्पष्टपणे व्यक्त केलेली आहे. ललित वाड;मयाची भाषा या विषयी भूमिका मांडताना भाषेचे स्वरुप कसे असते व ती कशी असावी यालबद्दलची आपल्या भूमिकेतून उपाय सुचवितात. ललित भाषेचे उद्दिष्ट म्हणजे अनुभव साक्षात करणे हे होय. भाषा म्हणजे शब्दांच्या साहाय्याने साधलेले अनुभवाचे सर्जन असते. वाड;मयातील भाषेतील शब्दांचे सामर्थ्य प्रकट करुन दाखविलेले आहे. ललित साहित्यातील शब्दांचे कार्य म्हणजे एका अनुभवाचे विश्व साक्षात प्रकट करणे. भाषेची वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. अनुभवाचे अनन्यसाधारण व चैतन्य रुप लक्षात आणून दिले. व्यवहाराच्या भाषेचे स्वरुप मांडून दाखविले. वाड;मयाची भाषा व व्यवहाराची भाषा या दोन्ही भाषेतील फरक उदाहरणासहित वा. ल. नी आपल्या भूमिकेतून मांडलेला आहे.

व्यवहारिक भाषेला वाड;मयाचे स्वरुप कशाप्रकारे प्राप्त होते. ते स्पष्ट करुन सांगितले. व्यवहारिक भाषा व वाड;मयाची भाषा यांच्यातील अंतर कमी झाले की भाषेचे स्वरुप एक होते. व्यवहारिक भाषेचे स्वरुप मांडले.

काव्याच्या भाषेचा विचार करताना काव्याची चालही शब्दावर व भावानुभवावर अवलंबून असते. त्यानुसार काव्याची चाल ठरत असते.

नाटकाची भाषा हि देखील संवादावर शब्दावर अवलंबून असते. असे त्यांचे मत आहे. वाड;मयप्रकारानुसार भाषेत बदल होतो असे वा. ल. चे मत आहे. भावानुभावावर भाषेचे स्वरुप अवलंबून असते. ललित कृती म्हणजे व्यक्तीमनाने शब्दांच्या साहाय्याने साधलेला एक शोध असतो. असे वा. लं. चे मत आहे.

अशा प्रकारे वा. ल. कुलकर्णी यांनी वाड;मयीन भाषेविषयी कल्पना मांडताना वाड;मयाच्या भाषेची वैशिष्ट्ये, भाषेमध्ये शब्दांमध्ये असणारे महत्व पटवून दिलेले आहे.

प्रकरण ४ थे म्हणजे वा. ल. कुलकर्णी यांची समीक्षेविषयीची भूमिका या प्रकरणामध्ये वा. ल.नी समीक्षा लेखन करत करत समीक्षेविषयी भूमिकाही स्पष्ट केलेली आहे. आपल्या भूमिकेतून वाड;मयाची समीक्षा ही कशी असते. आणि ती कशी असणे आवश्यक आहे. ते समीक्षकांना पटवून देण्याचे काम आपल्या भूमिकेतून वा. लं.नी स्पष्ट केलेले आहे. वाड;मयाची समीक्षाही वाड;मय विकासाची पायरी आहे असे वा. ल. स्पष्ट करतात.

वाड;मयातील समीक्षा हे एक महत्वाचे अंग आहे. असे वा. लं. ना दाखवून द्यायचे आहे. समीक्षेतून वाड;मयविषयक विचार मांडलेले आहेत. १९६५ ला हैदराबाद येथे झालेल्या साहित्य संमेलनाच्या वेळी अध्यक्षस्थान वा. लं. ना हैदराबादकरांनी बहाल केले. त्यावेळी वा. लं. नी भाषणातून देखील समीक्षेविषयी आपली भूमिका स्पष्ट केली.

साहित्याचा शोध कधीही संपणे शक्य नाही. आणि तो शोध का संपत नाही. हे ही वा. लं. नी आपल्या भूमिकेतून स्पष्ट करुन दाखविलेले आहे. समीक्षा करताना येणाऱ्या धोक्यापासून समीक्षकांना सावध ठेवण्याचे काम वा. ल. नी केले. समीक्षकांना समीक्षेची दिशा दाखवून देण्याचे काम वा. ल. नी केले आहे. समीक्षकाला उत्तम गुणाची जाणीव करुन दिली. समीक्षेने शोधक बुद्धिने जपणूक केली पाहिजे असे वा. ल. सांगतात. समीक्षेची आवड वाचकांच्या मनामध्ये निर्माण करुन देण्याचे काम वा. लं. नी केले.

टिका लेखनामागील वा. लं. ची भूमिका ही विशूद्ध कलावादी होती. समीक्षाही शोधाची प्रक्रिया आहे. आणि शोधकाच्या विनम्र बुद्धीने घेतलेला तो शोध आहे. समीक्षालेखन हे आत्मसुखार्थ केलेले आहे. समीक्षेचे रहस्य हे गुढ कशा प्रकारे असते. त्याचे स्वरुप वा. ल. स्पष्ट करुन सांगतात. समीक्षा लेखन करण्याची पद्धत आपल्या भूमिकेतून मांडतात. समीक्षेचा विकास होण्यासाठी कोणकोणत्या घटकांची आवश्यकता असते, ते घटक वा. ल. स्पष्ट करुन सांगतात. साहित्य समीक्षक हा सर्वज्ञ नसतो. असे विधान करुन विधानाचे समर्थन वा. ल. नी केलेले आहे. समीक्षेचा शोध म्हणजे एक गूढ असते असे वा. ल. मानतात.

वा. लं. ना जेव्हा तुम्ही समीक्षा लेखन का करता? असा प्रश्न विचारला तेव्हा उत्तर देत असताना समीक्षेचे उद्दिष्ट, तिचे स्वरुप, तिची प्रतिज्ञा, या सर्वांचा समावेश भूमिकेतून मांडलेला आहे. समीक्षा करीत असताना समीक्षकाला अनेक समीक्षकांना सामोरे जावे लागते. त्या समस्या कोणत्या आणि त्या समस्यांना सामोरे कसे गेले पाहिजे. याविषयी उपाययोजनाही वा. ल. नी सांगितलेली आहे. कलाकृती ही अनन्य साधारण असते म्हणून

कोणत्याही आडाख्यात तिला आपण बसवू शकत नाही. कलाकृती ही जिवंत असते तिला आडाख्यात समीक्षक बसवू शकत नाही.

समीक्षेची भूमिका ही बोधकाची कधीच राहात नाही. ती भूमिका वाड;मयांतर्गत सत्याचा शोध घेणाऱ्या शोधकाचीच असावी लागते.

अशा प्रकारे वा. ल. नी समीक्षेविषयीच्या आपल्या भूमिकेतून समीक्षेचा शोध कसा असतो. आणि कसा घेतला पहिजे. तो मार्ग आपल्या भूमिकेतून समीक्षकांना सांगण्याचा प्रयत्न करतात.

वा. लं. ची भूमिका ही समीक्षकांना समज देणारी आहे. वाड;मयातील समीक्षकांना मार्गदर्शन करणारी आपली भूमिका मांडली. आणि वा. लं. ची भूमिका ही खरोखरच मार्गदर्शक ठरणारी आहे.

प्रकरण पाचवे आहे. वाड;मयीन टिकाकार सर्वज्ञ की रसज्ञ? वा. ल. कुलकर्णी यांना वाड;मयाचे परीक्षण करताना अनेक समस्या निर्माण झाल्या. त्या समस्यांचा शोध घेण्याचा वा. ल. नी प्रयत्न केला. वाड;मयातील वादस्थळे पुस्तकातून वाड;मयविषयक अनेक प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यातच एक प्रश्न वाड;मयीन टीकाकाराविषयी वा. ल. नी उपस्थित केलेला प्रश्न म्हणजे वाड;मयीन टीकाकार सर्वज्ञ की रसज्ञ ?

वा. ल. कुलकर्णी यांनी समीक्षा लेखन केले. समीक्षेविषयी आपली भूमिका मांडली. त्याचबरोबर वाड;मयीन टीकाकार सर्वज्ञ नसतो तर तो रसज्ञ असतो. असे या प्रश्नाचे उत्तर वा. ल. देतात. केवळ प्रश्नाचे उत्तर देवून वा. ल. थांबत नाहीत तर त्या उत्तराचे समर्थन करण्याचे प्रयत्न करतात. आपल्या उत्तरामध्ये अनेक उदाहरणे देतात. अनुभव विशद करतात. कारणे सांगतात. आणि आपल्या उत्तराला कणखर बनविण्याचा प्रयत्न करतात.

वा. ल. हे स्वत: एक समीक्षक होते. वाड;मयाची समीक्षा जेव्हा वा. लं. नी केली. तेव्हा ती रसज्ञ बनूनच केली. रसज्ञ बनूनच समीक्षा करावी लागली. कारण सर्वज्ञ बनून समीक्षा ही करताच येत नाही. अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. सर्वज्ञ बनून समीक्षा करताना अनेक मर्यादांचा विचार करावा लागतो. कारण समीक्षक हा देखील एक मनुष्यच असतो हे विसरून चालत नाही. या प्रकरणामध्ये सर्वज्ञतेला येणाऱ्या मर्यादांचा उल्लेख वा. ल. नी केलेला आहे. त्याचबरोबर कलाकृतीचे स्वरुपच असे असते की, संपूर्ण कलाकृतीला कोणत्याही आडाख्यात टीकाकार बसवू शकत नाही. कलाकृतीला टीकाकार आडाख्यात का बसवून शकत नाही. याचीही कारणे वा. लं. नी या प्रकरणामध्ये नमूद केलेली आहेत. टीका करताना स्वत:ही एक रसज्ञ बनूनच वा. लं. नी समीक्षा केलेली आहे. स्वत:च्या अनुभवाद्वारे विवेचन मांडलेले आहे. समीक्षा करताना अपूर्णत्वाची कबूली देण्यचा नम्र पणा वा. लं. च्या ठिकाणी दिसून येतो.

परीक्षणकाराच्या व वाचकांच्या अपेक्षा टीकाकाराला पूर्ण कराव्या लगतात. त्या अपेक्षांचा उल्लेखही आपल्या प्रकरणात वा. लं. नी केलेला आहे. परीक्षणकाराचा टीकाकाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन मांडलेला आहे. आपल्या उत्तराचे समर्थन करण्यासाठी वा. ल. वामनराव जोशी यांचे विधान मांडतात. टीकाकारांची भूमिका वाड;मय शोधकाची असते बोधकाची नसते. एखाद्या पुस्तकाचे परीक्षण म्हणजे त्या ग्रंथातील गुण-दोषाचे जाहिर संकिर्णततच असते.

टीकाकारावर जरी असा आरोप केला सर्वज्ञतेचा तर टीकाकार म्हणेल की यापेक्षा लेखन सन्यांस

पत्करलेला बरा तो म्हणेल हे काम माझ्याच्याने जमणे शक्य नाही. अशीच प्रतिक्रिया टीकाकार व्यक्त करतात.

असा हा दिसावयास पेच प्रसंग असला तरी म्हणून तो सुटेपर्यंत परीक्षणे येणे थांबले आहे असे नाही.

अशा प्रकारे वा. ल. नी वाङ;मयीन टीकाकार सर्वज्ञ की रसज्ञ? या प्रश्नांवर वा. ल. नी वरील सर्व मुद्दयांचा आधार घेऊन आणि स्वत:च्या अनुभवावरुनही या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्रबंधिकेतील सर्वात शेवटचे प्रकरण म्हणजे ६ वे. वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेचे विशेष या प्रबंधिकेमध्ये एकूण सहा प्रकरणे आहेत. ह्या प्रकरणांचे लेखन करण्यासाठी समीक्षा लेखनाचा आधार घ्यावा लागला. वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षा लेखनाच्या पुस्तकांचा अभ्यास केल्या नंतर त्यांच्या समीक्षा लेखनाचे काही विशेष जाणवले. आणि ते विशेष प्रकरण ६ मध्ये मांडलेले आहेत. प्रकरण ६ वे वा. ल. कुलकर्णी यांच्या टीकालेखनाचे विशेष. या प्रकरणामध्ये वा. ल. च्या टीकालेखनाचे जे जे विशेष जाणवले ते सर्व नमूद केलेल आहेत. समीक्षा लेखन करताना समीक्षा लेखनातील पद्धतीमध्ये विशेष जाणवले. निरनिराळ्या अंगातून विशेष जाणवले. विशेष हे समीक्षा लेखनाच्या भाषेमध्ये जाणवले मांडणी, टापटीपपणा, पद्धतशीरपणा, या सर्वांतून विशेष जाणवले. समीक्षा लेखनाचा उद्देश, हेतू यांमधून विशेष जाणवले. समीक्षा लेखन करताना उपमा, उदाहरणे, अनुभव या सर्वांतून विशेष जाणवून समीक्षेच्या भाषेला निराळीच चमक प्राप्त करुन देण्याचे काम वा. ल. नी केले. समीक्षा लेखनामध्ये एक निराळाच ठसा या विशेषांमुळे उमटलेला दिसतो.

याप्रमाणे वा. ल. कुलकर्णी यांच्या साहित्य समीक्षेचे विशेष हे प्रधान सूत्र स्वीकारुन वा. ल. कुलकर्णींच्या अगोदरची समीक्षा कशी होती. मराठी समीक्षा लेखनाला वा. ल. कुलकर्णी यांनी वेगळेपण दिले याचा पडताळा या सर्व अभ्यासातून घडत जातो. वा. ल. कुलकर्णी यांची समीक्षा वाचतांना आपण एखाद्या प्रमेयाचे सहजपणे आकलन करुन घेत आहोत. अशा पद्धतीने त्यांच्या लेखनातील खुलासा सहज सुलभ आणि विवरणात्मक शैलीतून अवतरत जातो. आपले समीक्षालेखन करतांना ते पूर्णग्रह मुक्त मनाने त्याच्या कलाकृतीकडे पाहतात आणि त्यातून घडून येणाऱ्या विशेषांची नोंद अगदी अनाग्राही पद्धतीने आणि समाहिततेने नोंदवत जातात. त्यामुळे त्यांच्या समीक्षेत अभिविवेष येत नाही. तर एखादे उदाहरण जसे खुलासवार सोडवले. इतकी सुलभता त्यांच्या लिखानात येते. त्यामुळे वा. ल. कुलकर्णी यांची समीक्षा हा मराठी समीक्षा लेखनाला लाभलेला एक सहज सुंदर वस्तुपाठच आहे. असे म्हणावे वाटते. वा. लं. ची समीक्षा ही मराठी समीक्षेतील प्रभावी योगदान आहे.

*********